REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 7 | APRIL - 2019

# इस 1942 च्या राष्ट्रीय भारत छोडो आंदोलनाशी समांतर स्थानिक चळवळी व वैयक्तिक सत्याग्रह



प्रा. सुरेखा दिनेश गांगुर्डे
इतिहास विभाग ,
पेमराज सारडा महाविद्यालय अहमदनगर.

## प्रस्तावना

सन 1942 साली सुरू झालेले 'भारत छोडो' आंदोलन म्हणजेच 'चले जाव' चळवळ हा भारतीय राष्ट्रीय चळवळीचा परमोच्च बिंदू ठरला. दुसऱ्या महायुद्धाची भीषणता, जपानच्या आक्रमणाची वाढती भिती, आणि भारतातील राजकीय पेचप्रसंग सोडविण्यात क्रिप्स मंडळाला अपयश आले. यातून 1942 च्या आंदोलनाची पार्श्वभूमी तयार झाली.

7 व 8 ऑगस्ट 1942 रोजी मुंबई येथे गवालिया टँक मैदानावर राष्ट्रीय सभेच्या महासमितीचे अधिवेशन भरले. मौलाना अबुल कलम आझाद हे या अधिवेशनाचे अध्यक्ष होते. 8 ऑगस्ट 1942 रोजी पं. जवाहरलाल नेहरू यांनी त्या अधिवेशनात प्रसिद्ध 'भारत छोडो' ठराव मांडला प्रचंड बहुमताने तो संमत झाला. त्या ठरावात म्हटले होते की, भारतातील ब्रिटिश राजवटीची तात्काळ समाप्ती ही केवळ भारताच्या हितासाठीच नव्हे तर लोकशाही रक्षणाच्या ज्या तत्त्वांसाठी अमेरिका लढत आहे, त्यासाठी ही आवश्यक आहे. या ठरावावर बोलताना महात्मा गांधी म्हणाले, 'आम्हाला ताबडतोब स्वातंत्र्य पाहिजे. संपूर्ण स्वातंत्र्याशिवाय अन्य कशानेही माझे समाधान होणार नाही. आपण एकतर स्वातंत्र्य मिळवू अन्यथा ते मिळवण्याच्या प्रयत्नात मरण पत्करू. परंतु आपली गुलामगिरी कायमची राहिलेली पहायला जगणार नाही. त्यांनी कार्यकर्त्यांना 'करेंगे या मरेंगे'(Do or die) हा मंत्र दिला.

ब्रिटिश सरकारने राष्ट्रीय सभेचे 'भारत छोडो' आंदोलन दडपून टाकण्याची तयारी अगोदरच करून ठेवलेली होती 9 ऑगस्ट 1942 च्या भल्यापहाटे सरकारने महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, मौलाना आझाद, वल्लभभाई पटेल, डॉ. राजेंद्र प्रसाद, आचार्य जे. बी. कृपलानी, आचार्य नरेंद्र देव, डॉ. सय्यद महमूद, शंकरराव देव, असफ अली, डॉ. पट्टाभी सीतारामय्या, डॉ. प्रफुल्लचंद्र घोष, हरेकृष्ण मेहताब असे काँग्रेसचे बारा पुढारी अटक करूनस्थानबद्ध केले. महायुद्धात गुंतलेल्या सरकारला युद्ध प्रयत्नांना अडथळा आणणारी चळवळ नको होती.

राष्ट्रीय चळवळीच्या नेत्यांना अज्ञात स्थळी स्थानबद्ध करून या चळवळीची शक्ती नष्ट करण्याचा प्रयत्न ब्रिटिशांनी केला. या नेत्यांना चळवळीच्या केंद्रापासून दूर दक्षिणेत अहमदनगरच्या ऐतिहासिक भुईकोट किल्ल्यात ठेवण्यात आले. अहमदनगरच्या तुरुंगातील बंदीछावणी संपवून राजबंदयाना त्यांच्या त्यांच्या प्रांतातील तुरुंगात रवाना करण्याचा आदेश दिला. ही बातमी अहमदनगरकरांपासून गुप्त राखण्यात आली. 10 ऑगस्ट 1942 रोजी सुरू झालेली ही राजबंदी छावणी 20 एप्रिल 1945 रोजी बंद करण्यात आली. या जवळपास दोन हजार दिवसांच्या काळात राजबंद्यानी केलेल्या चर्चा म्हणजे एक ' ज्ञानसत्र' होते. असे डॉक्टर हरेकृष्ण मेहताब यांनी 1994 च्या लोकमत या वर्तमानपत्राच्या अहमदनगर पंचशताब्दी विशेषांकाला मुलाखत देतांना सांगितले होते. येरवड्याच्या तुरुंगाचे दुय्यम अधिकारी बाळकराम मेहता यांनी या राजबंदींच्या दैनंदिन सवयी, आवडी, आजार, लकबी, स्वभाव याविषयी आठवणी लिहून ठेवल्या आहेत. त्या श्री. मा. भावे यांनी महाराष्ट्र टाइम्सच्या 2002 च्या वार्षिक पुरवणीत मांडल्या आहेत.

**सत्याग्रहांना उधान**

15 ऑगस्ट 1940 रोजी मुंबई येथे राष्ट्रीय महासभेच्या अधिवेशनामध्ये वैयक्तिक सत्याग्रहाचे आंदोलन महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली घेण्याचा निर्णय झाला. सरकार युद्धात गुंतले असताना सामुदायिक सत्याग्रह करणे नैतिकदृष्ट्या योग्य नाही. म्हणून मर्यादित प्रमाणात वैयक्तिक सत्याग्रहाची करावे असे म. गांधींचे मत होते. त्यानुसार वैयक्तिक सत्याग्रह करत असताना आचार्य विनोबा भावे यांना युद्धविरोधी भाषण व सत्याग्रह केल्याच्या आरोपावरून तीन महिन्यांची शिक्षा करण्यात आली. वर्षभर वैयक्तिक सत्याग्रहात सुमारे 25 हजार सत्याग्रही तुरुंगात गेले. नंतर ही चळवळ बंद करण्यात आली. ब्रिटिश सरकारने बंदीवान सत्याग्रहींना सोडून दिले. वैयक्तिक सत्याग्रहा द्वारे महात्मा गांधींनी भारतात युद्धविरोधी आणि ब्रिटिश साम्राज्याच्या विरोधी भूमिका लोकांच्या मनात तयार केली.

महात्मा गांधींच्या नेतृत्वाखाली सुरू झालेले वैयक्तिक सत्याग्रह 1942 ला सुरू होऊन 1943 पर्यंत थांबविण्यात आले. परंतु अहमदनगर मधील राजकीय बंदीजनांचा आदर्श समोर ठेवून वैयक्तिक सत्याग्रहांना उधाण आले.ल. मा. पाटील, स्वामी सहजानंद भारती, आणि रावसाहेब पटवर्धन यांनी कोपरगाव, संगमनेर, अकोले, राहुरी, पाथर्डी, कर्जत, निघोज, बेलापूर, पुणतांबे, भिंगार, जामखेड, मढपिंपरी, निवासा अशा अनेक ठिकाणी सभा घेऊन युद्ध विरोध का करावा लागत आहे हे जनतेला समजावून सांगितले. युद्ध विरोधी घोषणा होऊ लागल्या. धरपकडीचे सत्र सुरू झाले. जिल्हा काँग्रेसचे रूपांतर सत्याग्रह कमिटीत करण्यात आले. प्रांतिक सत्याग्रह मंडळाचे अधिकारी शंकरराव देव यांच्या पत्रकानुसार सत्याग्रही वीरांच्या सह्या सत्याग्रह प्रतिज्ञा पत्रिकेवर होऊ लागल्या. सत्याग्रह शिक्षण शिबिर घेण्याचे ठरविण्यात येताच वैयक्तिक सत्याग्रहाचे शिक्षण देण्याकरता कमिटीच्या नेतृत्वाखाली भिंगार येथे शिबिर घेण्याचे ठरविण्यात येताच भिंगारचे पुढारी व कार्यकर्ते श्रीकृष्ण काकडे, पप्पू शेठ बापूराव हरके मोहनराव देव यांना पकडून कारागृहात डांबून ठेवण्यात आले.भिंगार च्या कार्यकर्त्यांना जनतेपासून वेगळे केले.

भारत छोडो या घोषणेने दिल्लीच्या राजप्रसादात बसून भारताच्या राज्य कारभाराची सूत्रे हलविणाऱ्या व्हाईसरायची खुर्ची हादरली. सरकारी अधिकाऱ्यांची धावपळ सुरू होऊन वर्किंग कमिटीच्या सर्व सभासदांना पकडून अहमदनगरच्या किल्ल्यात ठेवण्यात आले. ही बातमी सर्व अहमदनगर जिल्ह्यात विद्युत वेगाने पसरली. त्यामुळे जिल्हाभर हरताळ पाळण्यात आले. भिंगार येथील पुढाऱ्यांना स्थानबद्ध करताच वैयक्तिक सत्याग्रहाची मोहीम सुरू झाली. जाहीर सभेत 'भारत छोडो' ची घोषणा करून सत्याग्रही तुरुंगात जाऊ लागले. महात्मा गांधींची अनुज्ञा घेऊन रखमाजी बोंदर्डे व विठाबाई बोंदर्डे, श्रीकृष्ण कुकडे व पद्मावती बाई कुकडे या पती-पत्नीने सत्याग्रह केले. त्यावेळी जंगी मिरवणूक निघाली, सभा झाली. 'चले जाव' ची घोषणा करताच सत्याग्रही पती-पत्नींना अटक होऊन शिक्षा देण्यात आली राधाबाई देशमुख, शेवंताबाई नागपुरे आणि सुलोचनाबाई बडदे या तीन स्त्रियांनी हातात तिरंगि झेंडे घेऊन सत्याग्रह केला. या सत्याग्रही मिरवणुकीत बहुसंख्य स्त्रीयांनी भाग घेतला होता. स्त्री-पुरुषांच्या जमावासह मोर्चा फौजदार कचेरीवर नेण्यात आला. गगनभेदी अशा 'भारत छोडो', 'चले जाव' घोषणा होऊ लागल्या. कचेरीतील पोलिस व अधिकारी भांबावून गेले. त्यांनी लाठी हल्ला करण्याचा धाक घातला पण सत्याग्रहींनी माघार घेतली नाही. भिंगारच्या या तीन रणरागिनींना अटक करण्यात आली व सहा महिन्यांची शिक्षा ठोठावण्यात आली. भिंगारचा वैयक्तिक सत्याग्रह निष्ठापूर्वक चालू असताना चले जावच्या जाहीर घोषणा करिता व वैयक्तिक सत्याग्रह करण्यासाठी केशवराव गरुड यांनी सभा घेतली. सभेत सरकारचा निषेध करून 'भारत छोडो' ची घोषणा केली. त्या सभेला किल्ल्यात कुली म्हणून काम करणारे श्री, कारले, श्री. पावसे, श्री. शिंदे आणि श्री अंदुरे सभेला उपस्थित दिसल्यामुळे गुप्त पोलिसांकडून त्यांच्यावर पाळत ठेवण्यात आली. हे दोघे संरक्षण खात्यातील नोकर होते. या कूलींनी आपली कामगिरी चोख बजावली तशीच कळयंत्री टेलिफोनची कामगिरी उत्तम प्रकारे बजावून किल्ल्यातील संदेश बाहेर आणि बाहेरच्या घडामोडी आत अगदी बेमालूमपणे सुपूर्त केल्या. नेत्यांनी सत्याग्रही शिक्षणशिबिरे काढून सत्याग्रहाचे तंत्र आणि मंत्र यांची दिशा सुरुवातीपासूनच अहमदनगर जिल्ह्याला दिली असल्यामुळे' भारत छोडो' चा वनवा दिवसेंदिवस भडकू लागला. नगरच्या सत्याग्रही समितीतील पदाधिकारी गावोगावी प्रचार करून नागरिकांना व ग्रामस्थांना लढयास प्रवृत्त करू लागले.

### सरोष टॉकीज बॉम्बस्फोट

25 डिसेंबर 1942 च्या रात्री अकरा वाजण्याच्या सुमारास युरोपियन अधिकारी आणि सैनिक 'चॉकलेट सोल्जर' नावाचा चित्रपट पाहण्यात तल्लीन असताना बॉम्बस्फोट होऊन अनेक सैनिक जखमी झाले. बॉम्बस्फोट प्रकरणात बाळासाहेब सप्तर्षी ,डॉक्टर घाटे, हबीबखान ड्रायव्हर, राधाकिसन खोमणे, घनश्याम उद्धव वऱ्हाडे, अण्णा कामाठी ,आहेरे व गवळी या सात आरोपींना पकडून अटकेत ठेवण्यात आले. भरून खटला भरण्यात आला. 26 ऑगस्ट 1943 रोजी सुरू झालेल्या सरोष खटल्याचा आवाज साऱ्या महाराष्ट्रात दुमदुमला. सरकारकडील बाजू लंगडी पडली. पुरावा निष्फळ ठरला आणि न्यायाधीशांनी 20 सप्टेंबर 1943 रोजी निकाल देऊन सर्व आरोपींना निर्दोष मुक्त केले. या प्रकरणात सरकारी अधिकाऱ्यांनी आपली झालेली नाचक्की भरून काढण्यासाठी 26 सप्टेंबर 1943 रोजी आरोपींना पकडून स्थानबद्ध करून ठेवले. या प्रकरणाने जनता मात्र उत्साहित झाली.

### लष्करी छावणीतील बंडाळ्या

ब्रिटिश राजवटीविरुद्ध जेवढ्या म्हणून मोहिमा लढावयास पाहिजे तेवढ्या अहमदनगर जिल्ह्यात सुरू झाल्या होत्या. काही कार्यकर्ते 'भारत छोडो' च्या घोषणा गरजवंत होते, तर काही सरकार विरोधी प्रचार कार्यात गढून गेले होते, काही सावोनाईट च्या निर्मितीत गुंतले होते, तर काही बुलेटीन काढून ती सैनिकांच्या हातात पडतील अशा योजनेत रमून गेले होते. वैयक्तिक सत्याग्रह अखंडपणे कोपरगाव, पुणतांबे, संगमनेर, खर्डा, राहुरी, नेवासे, वांबोरी इत्यादी ठिकाणी डिक्टेटर नेमून चालू होते. अहमदनगर जिल्ह्याने साम्राज्यवादी सरकार विरुद्ध एक सारखा आगडोंब उसळला होता. अहमदनगर जिल्ह्यात चालू असलेल्या कार्याची आणि पुढील योजनांची माहिती बुलेटीनच्याद्वारे जिल्हाभर पोहोचविण्यात येत होती.

अहमदनगर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सदस्यांनी अच्युतराव पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली जोगळेकरांच्या बंगल्यावर बैठक घेऊन अहमदनगर जवळच्या लष्करी छावण्यांमधील मराठा आणि शीख रेजिमेंटमध्ये स्वातंत्र्याची ज्योत पेटविण्याचा निर्धार केला. तसेच अहमदनगर जिल्ह्यात लोकसत्ताक राज्याचा झेंडा फडकविला गेला पाहिजे असे ठरविण्यात आले.

अहमदनगर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या सदस्यांनी जिल्ह्यभर ब्रिटिश सरकारविरुद्ध सुरू केलेल्या कारवायांची माहिती असणारे बुलेटीन भिंगार सैनिकी कॅम्पमध्ये जातील याची योजना आखली. सरकारने जत्रा- यात्रांना बंदी घातली होती, तरी भिंगारच्या काही प्रतिष्ठित व्यक्तींचा जामीन घेऊन यात्रा भरविण्याची सरकारने परवानगी दिली. ही यात्रा लष्करी हद्दीत असल्यामुळे यात्रेची मजा पाहण्याकरता प्रतिवर्षी मराठा व शीख पलटणीतील अनेक सैनिक येत असत. या वेळीही यात्रेस सैनिकांची उपस्थिती होती. यावेळी भिंगारकॅम्प भागातील लष्करी छावणीत ब्रिटिशांविरुद्ध द्वेषभावना व स्वदेशाबद्दल राष्ट्रीय भावना निर्माण करण्याचा कार्यकर्त्यांचा मनोदय होता. या संधीचा फायदा घेऊन काँग्रेस कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय सेवादलाच्या सैनिकांमार्फत हजारो बुलेटीन काढून ती सैनिकांपर्यंत पोहोचवली. त्यातून 'चले जाव घोषणेचा मतितार्थ' व 'स्वातंत्र्याकरिता आव्हान' असा संदेश सैनिकांना देण्यात आला. सैनिकांमध्ये राष्ट्रीय जागृतीचे सुरुंग पेरण्यात आले. बुलेटीन काढणारे व ते वाटणाऱ्यांना सरकारने पकडण्याची मोहीम सुरू केली. कार्यकर्त्यांची स्वातंत्र्याची भावना अत्यंत तीव्र होती सैनिकी कॅम्पमध्ये जाऊन सैनिकांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करण्याचे असामान्य धाडस या नेत्यांमध्ये आलेले होते.

### भारत छोडो लढ्यातील सत्याग्रहांचे प्रकार व सत्याग्रही विरांगणा

अहमदनगर जिल्ह्यातील बहुतेक सत्याग्रही ' चले जाव' च्या घोषणेमुळे कारागृहात अडकून पडले होते. काहींना सरकारने स्थानबद्धतेत डांबून ठेवले होते, मोकळे होते ते फक्त भूमिगत. त्यांनी अहमदनगर जिल्ह्यात नुसता हाहाकार माजवून दिला होता. टाईम बॉम्ब सारखा दोस्त त्यांचा सहकारी होता. त्यामुळे सरकारी रेकॉर्ड जाळणे, आगी लावणे, तारा तोडणे, वटहुकूम, नोटीस भंग, रस्ता सत्याग्रह ,विलायती वस्त्र विरोधन, काँग्रेस पत्रिका डकविणे, महात्मा गांधी दिन,

राष्ट्रीय ध्वजारोहण, कॉंग्रेस पत्रिका विक्री, सिगारेट व दारू निरोधन, करबंदी प्रचार, प्रेसॲक्ट भंग, पोस्ट ऑफिस, औषधे विरोधन, भगतसिंग दिन, झेंडावंदन,हरताळ पाळणे, साखर बहिष्कार दिन, पेट्रोल, रॉकेल, परदेशी वस्तू, ताडी, स्टेशनरी बहिष्कार दिन, जंगल सत्याग्रह, प्रभात फेरी अशी कामे अव्याहतपणे सुरू होती. अशा कारवायांमधून सरकारला सतत गुंतवून ठेवणे आणि सरकारचे लक्ष वेधून घेतले जात होते.

अहमदनगर जिल्ह्यातील सत्याग्रही विरांगणा मध्ये जाईबाई राठोड, राधाबाई बाळकृष्ण देशमुख, मामीसाहेब कडुसकर, शेवंताबाई नागपुरे, सुगंधाबाई बाजीराव आवटी, सुलोचनाबाई बडदे, विठाबाई बोंदर्डे सहभाग होता.

या सर्वसामान्य कुटुंबातील महिला होत्या, परंतु स्वातंत्र्याची उर्मी त्यांच्या मनात जागृत झाली होती. घरातील संसारिक पाश तोडून या स्त्रिया अहमदनगरच्या सत्याग्रहात सहभागी झाल्या.

## सारांश

अहमदनगर जिल्हा पर्जन्यछायेच्या प्रदेशात मोडणारा आहे येथे दर तीन वर्षांनी दुष्काळ असतो. त्यामुळे येथील आर्थिक जीवन तसे कष्टप्रद आहे. या दुष्काळी भागात स्वातंत्र्याची ज्योत तेवत ठेवण्याचे कार्य येथील स्थानिक कार्यकर्त्यांनी केले . त्यांना रहिवाशांनी मोलाची साथ दिली. राष्ट्रीय चळवळीतील विविध योजना अहमदनगर पर्यंत बराच काळ लोटल्यानंतर पोहोचत होत्या. अनेकदा राष्ट्रीय नेत्यांनी ब्रिटिश शासनाविरोधात सुरू केलेल्या कारवाया अहमदनगर पर्यंत येई पावेतो त्यांच्या ध्येयधोरणात अमुलाग्र बदल झालेला असायचा. तरीही नगरवासी कॉंग्रेसच्या ध्येयधोरणांची अंमलबजावणी काटेकोरपणे करताना दिसत होते.अहमदनगरच्या बंदिवासात पंडित जवाहरलाल नेहरू यांनी 'भारताचा शोध' म्हणजे 'डिस्कवरी ऑफ इंडिया' हा प्रसिद्ध ग्रंथ लिहिला. डॉ. पी. सी. घोष यांनी 'हिस्टरी ऑफ एन्शंट सिव्हिलायझेशन' हा ग्रंथ लिहिला. मौलाना आझाद यांनी 'गुबारे खातिर' तर हरेकृष्ण मेहताब यांनी 'हिस्ट्री ऑफ ओरिसा' हा ग्रंथ लिहिला.अहमदनगर किल्ल्यातील बंदीजीवनकाळात या नेत्यांनी समृद्ध साहित्य निर्मिती केली.

पुढे भारत छोडो आंदोलनादरम्यान अहमदनगरचा भुईकोट किल्ल्यात स्थानबद्ध असणारे नरेंद्र देव यांच्या हस्ते याच अहमदनगरच्या किल्ल्यावर 1947 साली स्वातंत्र्याचा ध्वज फडकवण्यात आला. पंडित जवाहरलाल नेहरू यांनी भारताचे पंतप्रधान झाल्यानंतर पुन्हा 1953 व 1961मध्ये अहमदनगरच्या किल्ल्यास भेट देऊन बंदीजीवनातील आठवणी जागवल्या. या घटनांच्या अनुषंगाने अहमदनगर जिल्ह्याला स्वातंत्र्य चळवळीच्या काळात महत्त्व प्राप्त झाले होते. स्वातंत्र्योत्तर काळातही या राजबंद्यामुळे अहमदनगरचे नाव इतिहासात सन्मानाने घेतले जाऊ लागले. तसेच येथे राजकीय चळवळ उभी राहिली ती स्वातंत्र्य प्राप्तीसाठी अत्यंत पोषक ठरली. येथील स्थानिकांनी ब्रिटिशांविरोधात दिलेले लढे इतिहासात अमर झाले.

## संदर्भ ग्रंथ


1.निसाळ द. रं. संदेश वर्तमानपत्र, अहमदनगर, 9 ऑक्टोबर, 1940, पृष्ठ 3

2. निसाळ द.रं., संदेश वर्तमानपत्र, अहमदनगर, 8 ऑक्टोबर 1942, पृष्ठ 5

3. निसाळ द. रं. संदेश वर्तमानपत्र, अहमदनगर, 6नोव्हेंबर 1943, पृष्ठ 13

4.ऋषी पि. डी., शंभर वर्षातील नगरचे बदलते समाजजीवन 1901 ते 2014, प्रथम आवृत्ती, अहमदनगर, 2016, पुष्ट 35

5. श्रीपाद मिरीकर, अस्सल नगरी, प्रथमावृत्ती, अहमदनगर, 2010, पृष्ठ 27

6.देवचक्के अनिरुद्ध, अच्युतराव पटवर्धन समर्पित जीवनाची अनुपम गाथा, प्रथम आवृत्ती, मुंबई, 2005, पृष्ठ 29

6.भंडारी मिश्रीलाल हिरालाल, स्वातंत्र्यलढा व भिंगार, प्रथम आवृत्ती, भिंगार, 1960, पृ. 28 8.केळकर श्रीपाद, छोडो भारत 1942 काही महत्त्वाच्या घटना व कार्यक्रम, प्रथम आवृत्ती, मुंबई, 1960, पुष्ट 15

9.प्रधान ग. प्र., स्वातंत्र्यसंग्रामाचे महाभारत, साधना प्रकाशन, प्रथमावृत्ती, पुणे, 1998

10. ताराचंद, हिस्ट्री ऑफ फ्रीडम मुमेंट इन इंडिया, खंड चार, नवी दिल्ली, 1972